# आरोग्य संवर्धनाबरोबरच समाजकार्यासाठी धाव

## 'नाशिक रन'मध्ये १६ हजार जणांची नोंदणी : चिमुकल्यांपासून ज्येष्ठांचाही सहभाग

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १३ : महात्मानगर व मैदानाचा परिसर शनिवारी (ता. १३) भल्या पहाटेपासूनच व्यायामप्रेमींनी गजबजला. वैयक्तिक, गटागटाने आलेले विद्यार्थी, युवक- युवती, कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, उद्योजक, महिला व ज्येष्ठांचा उत्साह दांडगा होता. कुणी ट्रॅकसूट घालत धावण्यापूर्वी व्यायाम करत होते, कुणी धावण्यासाठी रांगेत उभे होते, तर कुणी इतरांना सहभागी होण्याचे आवाहन करत होते. या सर्वांचा उद्देश एकच, सुदृढ आरोग्य संवर्धनाचा आणि सामाजिक कार्याचा संदेश देण्याचा.

नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टच्या सोळाव्या 'नाशिक रन'च्या निमित्ताने हे चित्र शनिवारी (ता. १३) पाहायला मिळाले. या वेळी १६ हजार जणांनी नोंदणी केली होती.

महात्मानगर मैदानापासून सुरू झालेल्या या उपक्रमात प्रत्येकाने उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. एरवी आपल्या दैनंदिन कामात सतत व्यस्त राहणारे नामांकित कंपन्यांमधील अधिकारीही इतरांचा हुरूप वाढविताना दिसले. परदेशी अधिकारीही मागे नव्हते. ढगाळ वातावरण, थंडीत समाजकार्याचा वसा जपत 'नाशिक रन'मध्ये सारेच नाशिककर धावताना दिसले.

### मान्यवरांचा सहभाग

'नाशिक रन'चे बॉशकडून टीडीके-इपकॉसकडे हस्तांतर करण्यात आले. औपचारिक प्रारंभाप्रसंगी महापौर रंजना भानसी, पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल, ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष व बॉश लि.चे व्यवस्थापकीय संचालक सौमित्र भट्टाचार्य, माजी अध्यक्ष व इप्कॉस इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक नटराजन बालाकृष्णन, अतिरिक्त जिल्हाधिकारी नीलेश सागर, भविष्यनिर्वाह निधीचे विभागीय आयुक्त मिरज अश्रफ, बॉश इंडियाचे व्यवस्थापकीय सहसंचालक डॉ. अंड्रेस वोल्फ, बॉश उद्योगसमूहाचे कार्यकारी उपाध्यक्ष जॉन अलिव्हर, एच. एस. बॅनर्जी, उपाध्यक्ष एच. बी. थोंटेश, सचिव अनिल दैठणकर, खजिनदार राजाराम कासार, विश्वस्त अविनाश चिंतावर, मुकुंद भट, अतुल खानापूरकर, संदीप पांडे, प्रबळ रे, इपकोसचे उपाध्यक्ष राजू गाढवे, मंडळ चोप्रा, डॉ. व्यंकटेश, सिमेन्सचे प्रवीण कुलकर्णी, अटलास कोपकोचे सी. एम. पंडित, रंजन ठाकरे, स्थायी समिती सभापती शिवाजी गांगुर्डे आदी उपस्थित होते.




महात्मानगर : 'नाशिक रन'मध्ये शनिवारी महापौर रंजना भानसी, पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांच्या हस्ते तीन लाखांचा धनादेश स्वीकारताना प्रशिक्षक विजयेंद्रसिंग, कविता राऊत, किसन तडवी, आरती पाटील आदी.

### धावपटूंना मदतीचा धनादेश सुपूर्द

**ऑलिंपिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करताना नाशिकच्या धावपटूंना आर्थिक मदत व्हावी, या हेतूने ट्रस्टतर्फे मदत उपलब्ध करून दिली आहे. शनिवारी प्रायोजकत्वचे कराराचे कागदपत्र सौमित्र भट्टाचार्य, नटराजन बालाकृष्णन व नाशिक रनच्या विश्वस्तांतर्फे खेळाडूंना सुपूर्द करण्यात आले. ऑलिंपिकपटू कविता राऊत, 'साई'चे प्रशिक्षक विजयेंद्र सिंग, आरती सोनवणे, किसन तडवी आदी उपस्थित होते.**

### सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगत

कार्यक्रमात शालेय विद्यार्थिनींना सायकलवाटप केले. नारंग डान्स इन्स्टिट्यूटतर्फे बहारदार नृत्याचे सादरीकरण झाले. लकी ड्रॉमध्ये प्रथम क्रमांकास लेनोव्होचा स्मार्टफोन एआर टेक्नॉलॉजीतर्फे देण्यात आला. अभय स्टिलतर्फे उडन वार्डरोब १ व २ सिंगल बेड बक्षीस देण्यात आले. बीव्हीजी इंडियातर्फे पानोसोनिक लेड टीव्ही तर फुल डे मॅजेस्टिक अॅडव्हेंचर सोबत एक दिवसाच्या सहलीचे बक्षीस देण्यात आले. अंबिका स्वीटतर्फे सॅमसंग मोबाईल हँडसेट देण्यात आला. एसबी सर्व्हिसेस व श्री साई सर्व्हिसेसतर्फे सॅमसंग मायक्रो वेव्ह ओव्हन दिले. टी बी मोरडे कंपनीतर्फे सायकल देण्यात आली.



नाशिक : महात्मानगर येथे शनिवारी 'नाशिक रन'मध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी झालेले नाशिककर.

(बातमी पान ८ वर)